मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# मंडळीचा जन्म

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



जेंव्हा येशू मरण पावला, तेंव्हा त्याचे घाबरलेले अनुयायी लपून बसले होते. येशू मरणातून जिवंत झाल्यावर, स्वतःस शिष्यांना दाखविले. येशू जिवंत झाला होता ! परंतू – त्याच्या शिष्यांना सोडून जाण्याची योजना येशूने आखली, त्याच्या पित्यासंगती जेथे तो कायमचा राहतो तेथे स्वर्गात परत जाण्याची योजना होती.



त्यांना सोडून
जाण्याच्या आधि,
येशूने त्याच्या अनुयायांना अभिवचन
दिले होते की तो त्यांच्यासाठी देवाचा आत्मा
पाठविणार तो त्यांना समाधान देणारा व मदतनिस असा
होईल. (योहान १५:२६). ती वेळ जवळ आली होती ! येशू त्यांना
सोडून गेल्याच्या काही दिवसांनी देवाचा पवित्र आत्मा आला.

हे या प्रकारे घडले. जवळपास १२० येशूचे अनुयायी एका घरात
एकत्रित प्रार्थना करित होते. अचानक, मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारख्या
आवाजाने घर भरुन गेले.



वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा प्रत्येकावर एक एक अशा बसल्या. येशूने अभिवचन दिल्याप्रमाणे ते सर्वजण पवित्र आत्म्याने भरुन गेले !



बाहेर रस्त्यावर येशूचे अनुयायी अशा काही भाषांतून बोलले की ज्या भाषा ते कधिच शिकले नव्हते. येशूचे अनुयायी वेगवेगळ्या भाषांतून देवाची महान कार्ये सांगतांना बाहेर देशातून आलेल्या लोकांनी ऐकले. यरुशलेमला भेट देणारे लोक हे पाहून अचंबित झाले. ते एकमेकांस म्हणाले,
"हे काय असेल बरे?" परंतु दुसरे कित्येक
चेष्टा करित म्हणाले,
"हे द्राक्षारसाने
मस्त झाले
आहेत."



परंतू पेत्राने म्हटले, "ते नशा केलेले नाही... योएल संदेष्ट्याने जे सांगितले होते ते हे आहे..." पुष्कळ वर्षांपुर्वी देवाने पवित्र आत्मा देण्याचे आणि लोकांना आशिर्वादित करण्याचे व मदत करण्याचे जे अभिवचन दिले होते त्याची मग पेत्राने लोकांना आठवण करुन दिली.



पेत्राने लोकांना सांगितले की, त्यांनी पापापासून फिरावे आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्यावा. "...म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल." जवळपास ३,००० लोकांनी आज्ञापालन केले. येशूचे भक्त या नात्याने ते सर्व जण येशूच्या शिष्यांमध्ये सामिल झाले. जस जसे दिवस गेले तसतसे, पवित्र आत्मा ज्या दिवशी आला त्या दिवशी सुरवात झालेल्या मंडळीत अधिकाधिक लोकांची भर पडत गेली.



देवाच्या लोकांच्या जिवनात पवित्र आत्म्याने सामर्थ्य निर्माण केले. एके दिवशी, प्रार्थनेच्या समयी पेत्र व योहान दोघे एकत्रित मंदिरात गेले. मंदिराच्या बाहेरील दारात एक लंगडा भिकारी बसत असे. त्याने पेत्र व योहान यांच्याकडे पैसे मागितले.





मग पेत्र म्हणाला, "माझ्याजवळ सोने किंवा चांदी काही नाही, परंतू जे काही आहे ते मी तुला देतो; नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लाग." आणि त्याने त्याचा उजवा हात धरुन त्याला उठविले. तो उडी मारुन उभा राहिला व चालू लागला; आणि देवाची स्तुति करीत त्यांच्याबरोबर मंदिरात गेला.

चमत्कारामुळे आश्चर्यचकित झालेल्या लोकांनी मोठी गर्दी केली. पेत्राने त्यांना सांगितले की ज्याच्यामुळे तो लंगडा बरा झाला हे त्याचे सामर्थ्य नसून देवाचे सामर्थ्य आहे. देवाने येशूला मरणातून जिवंत केले याची पेत्राने जेंव्हा तेथील यहुदी लोकांना आठवण करुन दिली तेंव्हा मंदिराच्या पुढाऱ्यांनी रागाने पेत्र व योहान यांना अटक करुन तुरुंगात टाकले. तरी त्या दिवशी ५,000 लोकांनी येशूवर विश्वास ठेवला.



दुसऱ्या दिवशी, पेत्र व योहान ह्यांना मंदिराच्या अधिकाऱ्यांसमोर उभे करण्यात आले. "तुम्ही हे कोणत्या सामर्थ्याने किंवा कोणत्या नावाने केले?" असे त्या अधिकाऱ्याने विचारले. तेंव्हा पेत्र पवित्र आत्म्याने पुर्ण होऊन धैर्याने म्हणाला, "... ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले, ज्याला देवाने मेलेल्यातून उठविले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे."





न घाबरता तो पुढे म्हणाला, "...तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरुन आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नांव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही." लोकांनी येशूवर विश्वास करु नये असे ठरवून त्या अधिकाऱ्यांनी "येथून पुढे तुम्ही कोणत्याही मनुष्याशी येशूच्या नावाने बोलू नये अथवा शिकवू नये" अशी पेत्र व योहान यांना मोठी धमकी दिली.



एक वेळ अशी
होती जेंव्हा पेत्र
येशूसंगती उभा
राहण्यास अपयशी
ठरला होता. परंतू ती
घटना पवित्र आत्मा
येण्याच्या आधिची
होती. आता त्याला
कोणीही घाबरवू
शकत नव्हते.



पेत्र व योहान यांनी
त्यांना उत्तर दिले की,
"देवाच्या ऐवजी तुमचे
ऐकावे हे देवाच्या
दृष्टिने  योग्य की
अयोग्य आहे हे तुम्हीच
ठरवा; कारण जे आम्ही
पाहिले व ऐकले ते न
बोलणे हे आम्हांला
शक्य नाही."

अजून अधिक
धमकी दिल्यावर, त्या
अधिकाऱ्यांनी पेत्र व
योहान यांना सोडून दिले.
देवाच्या शुर सेवकांनी
न्यायालयात आणि
तुरुंगात जे काही घडले
त्याविषयी सर्व काही
सांगितले. मग त्यांनी स्तुति
आराधना व प्रार्थनेची मोठी सभा
भरवली. परत देवाच्या आत्म्याने
त्याचे लोक भरले, आणि
प्रारंभावस्थेत असलेली मंडळी
वाढत गेली आणि वाढत गेली.



मंडळीचा जन्म

परमेश्वराची वाणी – बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

प्रेषित १–४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16